लोकमत

# 'विम्बल्डन' टेनिसची पंढरी!

क्रीडा विश्वातून



सुनील वालावलकर
क्रीडा संघटक

**टेनिस खेळाची पंढरी म्हणून विम्बल्डन ग्रँडस्लॅम स्पर्धेची ओळख आहे. टेनिस विश्वातील चार ग्रँडस्लॅमपैकी ही सर्वांत प्रतिष्ठेची स्पर्धा मानली जाते. ही स्पर्धा इतर कोणत्याही टेनिस स्पर्धेच्या तुलनेत अत्यंत वेगळी आणि ऐतिहासिक आहे. येथे राजेशाही थाट आणि परंपरा यांची सांगड घालत आधुनिकतेचा हात पकडून स्पर्धा रंगते. स्पर्धेच्या निमित्ताने इंग्लंडची संस्कृती, इतिहास, वारसा, परंपरा अनुभवता येते.**

**विम्बल्डन स्पर्धेत** खेळाडूंची जितकी काळजी घेतली जाते, तितकीच काळजी प्रेक्षकांचीही घेतली जाते. स्पेनच्या कार्लोस अल्काराझने आपल्या सलामीच्या सामन्यादरम्यान एका प्रेक्षकाला अस्वस्थ वाटू लागल्याने सामना चक्क थांबवला आणि आयोजकांनीही त्या प्रेक्षकाला प्राधान्य देत योग्य ते उपचार पुरवले. स्पर्धेतील सामने डोळ्यांचे पारणे फेडतातच, पण येथील सुप्रसिद्ध स्ट्रॉबेरी आणि क्रीमचा आस्वाद घेत प्रेक्षक आपल्या जिभेलाही तृप्त करत असतात. अर्थात येथील प्रेक्षकांना कडक शिस्तीला बांधून घ्यावच लागतं आणि त्यामुळेच प्रेक्षक आणि खेळाडूंच्या अभिरुची संपन्न करणारा असा हा टेनिसचा अनुपम सोहळा वर्षानुवर्षे सुरू आहे. या वर्षी हवामान बदलाचा फटकाही विम्बल्डन स्पर्धेला बसला आहे. दरवर्षी येथे यावेळी पावसाळी वातावरण असते; पण यंदा खेळाडू आणि प्रेक्षकांना कडक उन्हाचा त्रास सहन करावा लागत आहे. विम्बल्डन स्पर्धेदरम्यान कबुतरांचा त्रास खेळाडू आणि प्रेक्षकांना होत असतो. या कबुतरांना हुसकावण्यासाठी खास प्रशिक्षित बहिरी ससाणा विम्बल्डन आयोजकांनी पाळलेला असतो. हे देखील या विम्बल्डन स्पर्धेचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

परंपरेच्या बाबतीत दक्ष असलेल्या विम्बल्डन स्पर्धेत यावर्षी महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. लाइन्सचा निर्णय देण्यासाठी विम्बल्डनमध्ये पंचांची एक भलीमोठी फौज तैनात असायची. मात्र, या वर्षापासून कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित कॅमेऱ्याच्या साहाय्याने लाइन्सचा निर्णय देण्यात येत आहे. या बदलाचे पडसाद उमटायला लागले असून, खेळाडूंच्या तीव्र प्रतिक्रिया येणे बाकी आहे.

विम्बल्डन स्पर्धेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील ग्रास कोर्ट. नैसर्गिक गवतावर खेळविण्यात येणारी जगातील ही एकमेव ग्रँडस्लॅम स्पर्धा असल्याने खेळाडूंना येथे खेळणे खूप आव्हानात्मक असते, तसेच आयोजकांना गवताची उंची कायम ठेवण्यासाठी कष्ट घ्यावे लागतात.




कॅमेरा वापरण्याचा हा नवा बदल वगळता विम्बल्डन स्पर्धेत गेल्या दीडशे वर्षांत कोणताही मोठा बदल झालेला नाही. स्पर्धक खेळाडूंनी पांढराशुभ्र गणवेश परिधान केलाच पाहिजे, या नियमांची काटेकोर अंमलबजावणी येथे वर्षानुवर्षे केली जाते. याविरुद्ध महिला खेळाडू नाराजीही व्यक्त करतात; परंतु ब्रिटनच्या शाही राजघराण्याचे पाठबळ असलेल्या या स्पर्धेची परंपरा आणि वारसा जपताना अशा विरोधाकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळेच स्पर्धकांच्या गणवेशावर व्यापारी लोगो वापरण्याससुद्धा विम्बल्डनमध्ये मनाई आहे.

'विम्बल्डन'चे थेट प्रक्षेपण प्रेक्षक घरबसल्या बघू शकत असले तरी प्रत्यक्ष सामने पाहण्यासाठी टेनिसरसिक रांगेत उभे राहून स्टेडियममध्ये प्रवेश मिळवतात. ज्यांना प्रवेश मिळत नाही, अशांसाठी हेन्मन टेकडीवरच्या मोकळ्या मैदानात मोठ्या पडद्यावर सामने पाहण्याची व्यवस्था आहे. या स्पर्धेत दिसणारी शिस्त सर्वांत लक्षणीय बाब आहे. खेळाडूंमधील वैर हे केवळ कोर्टापुरते असते. प्रत्येक खेळाडूचे समर्थकही त्या त्या कोर्टपुरताच जोश दाखवतात. कोर्टाबाहेर मात्र मैत्रीचे वातावरण असते.